अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार

२३.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १७३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712


## मौन धरणे आंदोलना दरम्यान अण्णा हजारेंना रडू कोसळलं

### विद्यार्थ्यांच्या हातातील पोस्टर पाहताच अश्रू अनावर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अहिल्यानगर*** – अहिल्यानगर येथे जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच मौन आंदोलन सुरु केलं आहे. तर या आंदोलनादरम्यान अण्णा हजारे काहीसे भाऊक झाल्याचे बघायला मिळाले.



दिल्ली येथील जंतर मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांना पाठिंबा देण्यासाठी नगरशहरातील वाडिया पार्क येथे अण्णांनी मौन आंदोलनाला सुरु केलंय. दरम्यान आंदोलनस्थळी पोहचताच समोर बसलेल्या विद्यार्थ्यांच्या हाती पोस्टर पाहताच अण्णा हजारे यांना अश्रू अनावर झाले. यावेळी ते भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या हातातील पोस्टर पाहताच अश्रू अनावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे आंदोलन सुरू असून अहिल्यानगरच्या वाडिया पार्क येथील महात्मा गांधी यांच्या स्मारकाजवळ अण्णांचे मौन आंदोलन सुरु आहे. या आंदोलस्थळाला नगरचे जंतर मंतर असे नामकरण करण्यात आले आहे. एकीकडे नवी दिल्लीसह देशातील विविध शहरांमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. 'लोकशाहीत जनतेचा आवाज दडपून नव्हे, तर संवादातून प्रश्न सोडविण्याबाबत' असा या पत्राचा विषय असून, आंदोलनादरम्यान घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, 'आज देशातील लाखो तरुण पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, बेरोजगारी आणि इतर अनेक प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत.

## संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार गदारोळ!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – नीट पेपरफुटीचा मुद्दा आणि जंतरमंतर व लगतच्या परिसरातील निदर्शकांवरील पोलिसांची कारवाई या मुद्द्यावरून बुधवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार गदारोळ झाला. राज्यसभेत कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले.





या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्याची तयारी सरकारने दर्शवली, परंतु गदारोळ करून विरोधक चर्चेला परवानगी देत ??नाहीत असा आरोप सरकारने केला. सरकार नीट पेपरफुटीवर चर्चा करण्यास तयार आहे, परंतु ही चर्चा कोणत्या नियमांतर्गत होणार, त्याची तारीख आणि कालावधी किती असेल, याबाबत सहमती घडवण्याचा अधिकार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचा आहे, अशी भूमिका संसदीय कामकाजमंत्री किरन रिजूजू यांनी मांडली.

सरकारने खुल्या मनाने चर्चा करण्याची तयारी दर्शवली असून, मी सर्वपक्षीय नेत्यांची मते ऐकून घेतली आहेत, असे बिर्ला म्हणाले. एकदा सदस्यांनी नियमांनुसार नोटीस दिल्यानंतर वेळेची कोणतीही मर्यादा असणार नाही आणि सर्व सदस्यांना हवे तेवढे बोलू दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मात्र याच दरम्यान, काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल विरोधक शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचीही मागणी करत आहेत याकडे लक्ष वेधले. यावरून मोठा गोंधळ झाला.

राज्यसभा तहकूब नीट पेपरफुटीच्या प्रकरणावरून सरकार आणि विरोधकांमध्ये झालेल्या जोरदार गदारोळानंतर राज्य सभेचे कामकाज बुधवार दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले. या प्रश्नी विरोधकांना नियम २६७ अंतर्गत इतर सर्व कामकाज स्थगित करून याच मुद्द्यावर चर्चा हवी होती. चर्चा सुरू करण्यापूर्वी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशीही त्यांची मागणी होती. उपसभापती हरिवंश यांनी सदस्यांना सहमती दर्शवून चर्चा पुढे नेण्याचे आवाहन केले. मात्र 'इंडिया आघाडीचे वर्तन बेजबाबदार असून ते संसदेची प्रतिष्ठा नष्ट करत आहेत, असा आरोप सभागृहाचे नेते जे.पी. नड्डा यांनी केला. यानंतर गदारोळ वाढत गेल्याने उपसभापतींनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले.

काळे कपडे घालून निषेध दरम्यान शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संसद भवनात लोकसभा अध्यक्षांची भेट घेतली. तर सोमवारी दिल्लीत आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या निषेधार्थ बहुतांश काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे सदस्य संसदेत काळे कपडे घालून आले होते.

## थोडक्यात

### पवईत इलेक्ट्रिक बस दुभाजकावर आदळली : ७ प्रवासी जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मुंबईत बेस्टच्या अपघातांची मालिका सुरू असतानाच गुरुवारी (दि.२३) आणखी एक अपघाताची घटना समोर आली आहे. पवई येथे बेस्टच्या इलेक्ट्रिक बसने रस्त्यावरील दुभाजकाला धडक दिल्याने सात प्रवासी जखमी झाले. या अपघातानंतर जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, प्राथमिक चौकशीत चालकाने एका कारकडे लक्ष गेल्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगितले आहे. पवईत सकाळी अपघात बेस्ट प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात गुरुवारी सकाळी ११.०५ वाजण्याच्या सुमारास पवई विहार संकुलाजवळ घडला.

## शाळेत मधल्या सुट्टीत धावताना अचानक कोसळल्याने ८ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नागपूर*** – शहरातील जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका खासगी शाळेत अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावणारी घटना घडली आहे. दुपारी मधल्या सुट्टीच्या वेळी मित्रांसोबत खेळत असताना तिसऱ्या वर्गात शिकणारा अवघ्या आठ वर्षांचा मुलगा अचानक चक्कर येऊन खाली कोसळला. उपचारासाठी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे शाळा परिसर, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांवर मोठा शोककळा पसरली आहे. समता नगर येथील रहिवासी असलेला फनित कटरे असे मृत बालकाचे नाव आहे.

## मुंबई महानगरपालिकेच्या कॅन्टीनवर धाड टाकत थेट सील करुन टाकले : तुकाराम मुंढेंच्या एफडीएची कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – सध्या आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची संपूर्ण राज्यासह देशभर चर्चा आहे. अन्न व औषध प्रशासनानेचे आयुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभरातील धडाकेबाज कारवायांनी अन्न माफियांवर मोठा आळा बसला आहे. याचदरम्यान तुकाराम मुंढे यांच्या एफडीएने आता थेट बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील कॅन्टीनमध्ये धाड टाकली. यानंतर बीएमसी मुख्यालयातील कॅन्टीन सील करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.





तुकाराम मुंढेंच्या एफडीएकडून राज्यभरात अनेक छोट्यांपासून मोठ्या हॉटेलवर कारवाई करण्यात आली. आता एफडीएने मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील कॅन्टीनवर देखील कारवाई केली आहे. एफडीएच्या या कारवाईमुळे मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आज जेवणाचा डबा सोबत ठेवावा लागणार आहे. महानगरपालिका कॅन्टीनमध्ये दररोज ७ ते ८ हजारांपेक्षा अधिक लोक जेवून जातात, अशी माहिती आहे. यापूर्वीही एफडीएने स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याच्या कारणावरून मुंबईतील प्रसिद्ध के. रुस्तम आईस्क्रीम पार्लर, शालीमार रेस्टॉरंट आणि नूर मोहम्मदी रेस्टॉरंट यांच्या परवान्यांवरही निलंबनाची कारवाई केली होती. सध्या आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची संपूर्ण राज्यासह देशभर चर्चा आहे. अन्न व औषध प्रशासनानेचे आयुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभरातील धडाकेबाज कारवायांनी अन्न माफियांवर मोठा आळा बसला आहे. याचदरम्यान तुकाराम मुंढे यांच्या एफडीएने आता थेट बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील कॅन्टीनमध्ये धाड टाकली. यानंतर बीएमसी मुख्यालयातील कॅन्टीन सील करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

तुकाराम मुंढेंच्या एफडीएकडून राज्यभरात अनेक छोट्यांपासून मोठ्या हॉटेलवर कारवाई करण्यात आली.

## पोलीस आंदोलकांमध्ये जंतर-मंतरवर पुन्हा धुमशान

### परस्परांवर आरोप प्रत्यारोप : पोलिसांनी फोडल्या अश्रुधुराच्या नळकांडया, लाठीमार : विद्यार्थ्यांची दगडफेक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – 'नीट' पेपरफुटीवरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान बुधवारी रात्री दिल्लीतील अंतर-मंतर परिसरात पुन्हा संघर्ष उडाला. पोलिसांचा लाठीमार आणि आंदोलकांची दगडफफेक, यामुळे सर्वत्र गोंधळ उडाला. यात अनेक पोलिस आणि आंदोलक जखमी झाले. हिंसाचार कसा सुरू झाला, याचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकले नाही. हिंसाचार सुरू केल्याचे परस्परांवर आरोप आंदोलक आणि पोलिसांनी केले आहेत.



अंतर-मंतरवरील आंदोलन थांबवावे म्हणून पोलिसांनी सोमवारी तेथील मंडप आणि मंच हटवला होता. त्यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर अश्रुधुराच्या नळकांडचा फोडत लाठीमार केला होता. यात सुमारे दीडशे आंदोलक जखमी झाले होते, तर ५० पोलिस जखमी झाल्याचा दावा पोलिसांनी केला होता. आज नेहमीप्रमाणे बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांवर अचानक दगडफफेक होऊ लागली. त्यामुळे पोलिसांनी लाठीमार सुरू केला.

पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल कारवाई सुरू केल्याने एकच गोधळ उडाला. त्यानंतर पोलिसांनी अतिरिक्तकुमक मागवली. त्यांनी आंदोलकांवर लाठीमार सुरू केला. त्यावेळी काही आंदोलक हातात काठ्या घेऊन पोलिसांवर तुटून पडू लागले. त्यामुळे जंतर-मंतरला जणू एखाद्या रणांगणाचे स्वरूप आले. एकाचवेळी पोलिसांवर तुटून पडणारे आंदोलक आणि पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांना रोखणारे आंदोलक, असे मिश्र चित्र पाहायला मिळत होते. प्रस्तुत प्रतिनिधीलाही याचा फटका बसला. रात्री उशिरापर्यंत हा गोंधळ सुरू होता.जंतर-मंतरवरील आंदोलनातील काहीजण

टॉलस्टॉय मार्गावर पोहोचल्यानंतर दगडफफेक आणि बाटल्या फेकण्यास सुरुवात झाली. मात्र, दगडफफेक नेमकी कोणत्या कारणामुळे झाली किंवा आंदोलनकर्ते अचानक आक्रमक का झाले, याबाबत रात्री उशिरापर्यंत स्पष्ट माहिती समोर आली नाही. या घटनेनंतर परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## 'नीट परीक्षा पूर्णपणे रद्द करा...': इकडे जंतर-मंतरवर विद्यार्थी आंदोलन पेटलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – सध्या देशात नीट पेपरफुटी प्रकरण आणि त्यावरुन केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉकरोच जनता पार्टीनं आंदोलन सुरू केलंय. आता हे आंदोलन देशातल्या गावाखेड्यांत पोहोचलं असून सर्वत्र याचे पडसाद पाहायला मिळत आहेत. अशातच, बहुतेकांनी या

### तिकडे मुरव्यमंत्री थलपती विजय यांची मोठी मागणी





आंदोलनाला पाठींबा दिला सडेतोड कामाच्या शैलीसाठी आहे. अशातच सध्या आपल्या प्रसिद्ध असलेले तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपती विजय यांनीही विद्यार्थी आंदोलन आणि नीट परीक्षेतील घोटाळा यावर प्रतिक्रिया दिली आहे. तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि 'तमिळगा वेत्री कळगम' चे अध्यक्ष सी. जोसेफ विजय यांनी बुधवारी नीट पेपरफुटी प्रकरणावरुन सुरू असलेल्या देशव्यापी निदर्शनांबाबत आपली भूमिका मांडली.






# संतांचे पालखी सोहळे पंढरपुरात दाखल

## ज्ञानेश्वर माऊली आणि सोपान काका बंधू भेटीचा अपूर्व सोहळा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पंढरपूर** – संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यांसह अन्य संतांच्या पालख्यांनी बुधवारी पंढरपूर तालुक्यात प्रवेश केला. दसुर जवळ मावळतीला पावसाच्या सरी झेलत माऊली व संत सोपान काका यांच्या बंधू भेटीचा अपूर्व सोहळा पार पडला.

दरम्यान राज्यभरातून आषाढी सोहळ्यासाठी येत असलेले पालखी सोहळे व दिंड्या या पंढरपूर तालुक्यात दाखल झाल्या आहेत. वेळापूरचा मुक्काम आटोपून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी भंडीशेगाव मुक्कामासाठी पंढरपूर तालुक्यात पोहोचली. वाटेत माळिशरस तालुक्यातील ठाकूरबुवांच्या समाधी जवळ मोठ्या भक्तीमय वातावरणात गोल रिंगण झाले. तर पिराची कुरोली येथील टप्पा परिसरातील दसुर पाटीजवळ सासवड येथून आलेल्या संत सोपानदेव यांच्या पालखी सोहळ्याची भेट माऊलींच्या पालखीसोबत झाली. हा बंधू भेटीचा सोहळा डोळ्यात साठवण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

त्यापूर्वी दुपारी संत सोपान देव, संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा बोंडले येथून दसुरकडे मार्गस्थ झाला होता. सोपानदेव पालखी, संत तुकाराम महाराज पालखी तसेच संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी दुपारी दसुरपाटी येथे पोहोचली. ग्रामस्थांच्यावतीने या सोहळ्याचे मोठ्या भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. सर्व संतांचे पालखी सोहळे मुक्कामासाठी पंढरपूर नजीक वाखरी या ठिकाणी येणार आहेत. तत्पुर्वी वाटेत बाजीराव विहीर येथे ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे गोल रिंगण तर संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे उभे रिंगण पार पडणार आहे. जिल्हा प्रशासनाच्यावतीने या दोन्ही रिंगण सोहळ्यांची तयारी करण्यात आली आहे.

आषाढी एकादशी

# तुकोबांच्या पालखीतील पहील्या उभ्या रिंगणाने माळीनगर विठ्ठलमय

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**माळीनगर** – येथे जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील पहिले उमे रिंगण मंगळवारी सकाळी ८.४५ च्या सुमारास माळीनगर येथे अभूतपूर्व आणि भक्तिमय वातावरणात पार पडले. पालखी महामार्गावरील रिंगणस्थळी मानाच्या अश्वाने घेतलेल्या नेत्रदीपक दौडीने हजारो वारकऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. टाळ-मृदंगाचा अखंड निनाद, 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमलेला परिसर आणि विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण माळीनगर भक्तिरसात न्हाऊन निघाले.

पंधरा दिवसांपासून पंढरपूरच्या दिशेने अखंड हरिनाम घेत मार्गक्रमण करणारा वारकरी संप्रदाय माळीनगरमध्ये दाखल होताच मक्तीचा महासागर उसळला. माळीनगर पालखी षाढ महामार्गावर झालेल्या उभ्या रिंगणात मानाच्या अश्वाने घेतलेली भरधाव दौड पाहण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अश्व रिंगणात धावताच 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमला आणि प्रत्येक वारकरी तो अविस्मरणीय क्षण आपल्या डोळ्यांत साठवून ठेवत होता. कपाळी अष्टगंध, गळ्यात तुळशीमाळ, हातात टाळ-मृदंग मुखी विठ्ठलनामाचा अखंड गजर अशा वातावरणात संपूर्ण माळीनगर विठ्ठलमय झाले होते. पालखी स्वागतासाठी माळीनगर ग्रामपंचायत, दि सासवड माळी शुगर फॅक्टरी, महात्मा पतसंस्था, फुले शुगरकेप सोसायटी, विविध सामाजिक संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी र ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर माळीनगर ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, माळी शुगरचे विविध विभाग, पोलिस प्रशासन तसेच स्वयंसेवकांनी भाविकांच्या सोयीसाठी उत्कृष्ट नियोजन करून चोख व्यवस्था राखली. त्यामुळे संपूर्ण सोहळा अत्यंत





### उड्डाणपुलामुळे वाहतूक सुरळीत

पालखी सोहळा मार्गस्थ होताना पुणे जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे यंदा पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची संख्या घटल्याची जाणवत होते. तसेच माळीनगर येथील उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला केल्यामुळे वाहनांची गर्दी देखील झाली नाही.



पालखी सोहळयाचे तिसरे व जिल्हयातील पहिले गोल रिंगण लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत पार पडले.

# ...अश्व धावती रिंगणी, नाचे विठू काळजात!

## *भक्तिमय वातावरणात न्हाउन निघाला सोलापूर जिल्हा
## *पुरंदावडे येथे माउलींच्या पालखीचे गोल रिंगण

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

*माळिशरस/अकलूज* – **तुझा पाहुनी सोहळा, माझा रंगला अभंग। गेला शिणवटा सारा, मेघ झाले पांडुरं।। नाम घेता तुकोबाचे, डौले पताका डौला। अश्वधावती रिंगणी, नाचे विठू काळजा।।**

विठू नामाचा जयघोष करीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा पालखी सो-हळा लाखो वैष्णवांच्या मांदियाळीसह सोमवारी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. दरम्यान, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण पुरंदावडे येथे झाले, तर संत तुकोबारायांच्या पालखीचे तिसरे गोल रिंगण अकलूजच्या सदाशिवराव माने विद्यालयाच्या मैदानावर उत्साहात पार पडले.

सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते येथे पहाटे माऊलींची नैमित्तिक पूजा व आरती झाल्यानंतर सकाळी ६.३० वाजता माऊलींसह नगरीचा लाखो वैष्णवभक्तांनी नातेपुते निरोप घेतला. नातेपुते पासून माळिशरसपर्यंत सुसज्ज असा चार पदरी पालखी मार्ग झाल्याने वारकऱ्यांची चांगली सोय झाली होती. आल्हाददायक वातावरणात सुमारे दीड ते दोन लाखांच्या पायदळासह भागवत धर्माची पताका फडकावित श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याने पालखी सोहळ्यातील पहिल्या रिंगण सोहळ्यासाठी पुरंदावडेकडे कूच केली. दुपारी २ वाजता सोहळा पुरंदावडे येथील मैदानावर रिंगण सोहळ्यासाठी पोहोचला. रिंगण सोहळ्यानंतर दिड्या दिड्यांमध्ये विविध खेळ रंगले. हुतुतू, गड्यास गडी, हमामा, सुरपाट, कबड्डी, खो-खो, फुगडी अशा खेळांनी वारकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. टाळ, मृदुंगाच्या साथीने आसमंत व्यापून टाकणारा नादब्रह्म सुरू झाला. रिंगण व उडीच्या कार्यक्रमानंतर माऊलींचा पालखी सोहळा येळीव फाटा येथे विश्रांती घेऊन माळिशरसकडे मार्गस्थ झाला.

### तुकोबारायांच्या पालखीवर ३ जेसीबीच्या साह्याने पुष्पवृष्टी

विठू नामाचा जयघोष करीत जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यासोबत लाखो वैष्णवांच्या मांदियाळीने सोमवारी सकाळी ८.३० वाजता नीरा नदी ओलांडून सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत अकलूज येथे प्रवेश केला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्थावर ३ जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवष्टी केली. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

## ठाकूरबुवा समाधी मंदिर परिसरात लाखो भाविकांची अलोट गर्दी

## भक्तिरस आणि टाळ-मृदंगाने मंदिर परिसर दुमदुमला



(प्रतिनिधी वरूड दर्पण)

***वेळापूर*** – वेळापूर-पंढरपूर मार्गावरील प्रसिद्ध ठाकूरबुवा यांच्या समाधी मंदिराच्या भक्तिमय परिसरात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे अत्यंत नेत्रदीपक व नयनरम्य गोल रिंगण पार पडले.

'माऊली माऊली'चा अखंड जयघोष आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. लाखो भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेला हा सोहळा लक्ष लक्ष नयनांनी अनुभवला. या सोहळ्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

रिंगणाच्या मध्यभागी पालखी विराजमान झाल्यानंतर तिच्याभोवती वीणेकरी, पताकाधारी आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला वारकऱ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध गोल कडे (रिंगण) केले. यानंतर वारकऱ्यांनी पारंपरिक उडीचा खेळ, फुगडी, पावल्या आणि काटवट अशा विविध खेळांचे बहारदार सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली.

## संपादकीय

**{ प्रयत्न करणे सोडू नका, कारण शेवटची गुरुकिल्ली सुद्धा कुलूप उघडू शकते. }**

# शिक्षण, रोजगार आणि न्यायासाठीचा आवाज

भारताची राजधानी दिल्लीतील जंतरमंतर हे केवळ आंदोलनाचे ठिकाण नाही, तर लोकशाहीत जनतेचा आवाज बुलंद करण्याचे प्रतीक मानले जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांवर देशभरातून नागरिक येथे येऊन आपली भूमिका मांडतात. अलीकडेच संघर्षवादी विद्यार्थ्यांनी जंतरमंतरवर केलेले आंदोलन हे देशातील शिक्षण व्यवस्था, स्पर्धा परीक्षा, रोजगार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित गंभीर प्रश्न अधोरेखित करणारे ठरले आहे. या आंदोलनाने सरकार, प्रशासन आणि समाजाचे लक्ष विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे वेधले. विद्यार्थी हा देशाचा भावी नागरिक आणि राष्ट्रनिर्मितीचा कणा मानला जातो. मात्र आजचा विद्यार्थी अनेक अडचणींना सामोरा जात आहे. स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, परीक्षा वेळेवर न होणे, निकालांतील विलंब, भरती प्रक्रिया रखडणे, वाढती बेरोजगारी, शिक्षणाचा वाढता खर्च आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव या समस्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. अनेक तरुण वर्षानुवर्षे अभ्यास करूनही त्यांना योग्य संधी मिळत नाही. परिणामी त्यांचा संयम सुटू लागला असून आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे.

जंतरमंतरवरील आंदोलनात विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या शांततापूर्ण पद्धतीने मांडल्या. पारदर्शक परीक्षा प्रक्रिया, पेपरफुटीला आळा, रिक्त सरकारी पदांची तातडीने भरती, वेळेवर परीक्षा व निकाल, तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी या प्रमुख मागण्या त्यांनी केल्या. या मागण्या कोणत्याही एका राज्यापुरत्या मर्यादित नसून संपूर्ण देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. अनेक राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटल्याच्या घटना वारंवार घडल्या आहेत. त्यामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. काही जण चुकीच्या मार्गाने यश मिळवतात, तर मेहनती विद्यार्थ्यांच्या वाट्याला केवळ निराशा येते. ही परिस्थिती देशाच्या गुणवत्ता–आधारित व्यवस्थेसाठी घातक आहे. परीक्षा प्रणालीवरील विश्वास टिकवायचा असेल तर पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि दोषींवर त्वरित कारवाई आवश्यक आहे.

रोजगाराचा प्रश्नही विद्यार्थ्यांच्या आंदोलनामागील महत्त्वाचा मुद्दा आहे. लाखो पदवीधर आणि स्पर्धा परीक्षेचे उमेदवार अनेक वर्षे नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. विविध विभागांमध्ये हजारो पदे रिक्त असूनही भरती प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. तरुणांच्या ऊर्जेचा योग्य वापर न झाल्यास त्याचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम गंभीर होऊ शकतात. आज शिक्षणाचे व्यापारीकरणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. महागडी फी, कोचिंग क्लासेसचे वाढते जाळे आणि ग्रामीण भागातील अपुऱ्या सुविधा यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहते.

## राशिभविष्य

**मेष :** स्वावडोली गोष्ट मार्गी शारीरिक कामानत ठिकाणी तुमच्या निर्णयाला महत्व मिळेल. आर्थिक प्रगतीची शक्यता. प्रवासाचा योग.

**तुळ :** सकारात्मक गोष्टींवर भर द्याल. नोकरीमध्ये यश मिळेल. समाजात तुमचा प्रभाव वाढेल. एखादी जुनी इच्छा पूर्ण होईल.

**वृषभ :** दीर्घकाल प्रलंबित कामे मतभेद निवळतील. करारात दूरदृष्टी ठेवा. खर्च होईल. आर्थिक बाबी हाताळ पूर्वी शकते. आरोग्याच्या तक्रारी कमी होतील.

**वृश्चिक :** महत्वाच्या निर्णयात धाडस वाढेल. नवीन प्रस्ताव येईल. आर्थिक लाभ होईल. शुभवार्ता मिळेल. उत्साहवर्धक घडामोडींचा दिवस.

**मिथुन :** नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना स्पर्धा यशाची मिळेल. रक्तसंतेत वाढ होईल. मानसिक शांतता मिळेल.

**धनु :** नोकरीत प्रगतीचे संधी मिळतील. परदेशी प्रवासाचा योग. जमीन, गुंतवणुकीतून फायदा होईल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**कर्क :** नोकरी-व्यवसायात नवीन संधी मिळेल. प्रभाववृध्दी मिळेल. वरिष्ठांकडून कौतुक होईल. आर्थिक चुका टाळा, बचत वाढवेल.

**मकर :** व्यवसायाचे संबंधी काम पूर्ण होईल. व्यवहारातील अडचणी दूर होतील. उत्पन्न वाढेल. मुलांच्या प्रगतीचा आनंद.

**सिंह :** यशाची नवी दारे उघडतील. अडकलेले ध्येय पूर्ण होतील. मित्रांच्या मदतीने कामात गती येईल. आत्मविश्वास वाढी मिळेल.

**कुंभ :** मोठी रकम हातात येईल. महत्वाच्या कामात पूर्ण होईल. आर्थिक स्थिती सुधारेल. लोकांशी व्यवहारात नवीन अनुभव मिळतील.

**कन्या :** नवीन यशाची शुभवार्ता यशस्वी ठरेल. करिअरमध्ये प्रगती होईल. बदलाची सुरूवात होईल. समाजात मिळेल. चिंता दूर होईल.

**मीन :** मोठी चिंता संपणार आहे. कौटुंबिक जीवनात आनंदांचे क्षण अनुभवाल. धार्मिक, नवीन उत्साहवर्धक मार्ग खुला होईल.

॥ शुभ दिनाची शुभ सुरूवात करा आणि आनंदी रहा ॥

# हुंड्याचे समाजशास्त्र, उच्चशिक्षित झालात : पण विचार बदलले का?



भारतीय समाजाने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. मुली आज शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, संशोधन, उद्योग, राजकारण, संरक्षण, समाजकार्य आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. स्त्री–पुरुष समानता, महिला सक्षमीकरण आणि मानवी हक्क यांवर आज मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. विद्यापीठांमध्ये समाजशास्त्र, समाजकार्य, लिंगभाव आणि स्त्री अभ्यास शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र आणि मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी, इतिहास, अर्थशास्त्र यांसारख्या विषयांमधून मानवी मूल्य, समानता, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांचे शिक्षण दिले जाते.

परंतु या सर्व प्रगतीच्या पार्श्वभूमीवर एक प्रश्न आजही अस्वस्थ करतो. उच्चशिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली असूनही उच्चशिक्षितांमध्ये विवाहाच्या वेळी हुंडा घेण्याची प्रथा का टिकून आहे? शिक्षण वाढले, पदव्या वाढल्या, पगार वाढले, प्रतिष्ठा वाढली; पण विचार खरोखर बदलले का?

समाजशास्त्राच्या दृष्टीने हुंडा हा केवळ विवाहाच्या वेळी होणारा आर्थिक व्यवहार नाही. तो पितृसत्ताक सामाजिक रचना, स्त्रीविषयीची दुय्यम मानसिकता, सामाजिक प्रतिष्ठेची स्पर्धा, आर्थिक विषमता आणि परंपरेच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाचे प्रतीक आहे. समाज ज्या मूल्यांना मान्यता देतो, त्या मूल्यांच्या आधारेच अशा प्रथा टिकून राहतात.

सामाजिक कार्य करत असताना माझी सुरुवातीची समजूत अशी होती की हुंडा ही समस्या मुख्यतः अशिक्षित किंवा ग्रामीण समाजात अधिक असेल. परंतु प्रत्यक्ष अनुभव, विविध प्रकरणांचे निरीक्षण आणि सामाजिक वास्तवाचा अभ्यास करताना लक्षात आले की अनेक वेळा उच्चशिक्षित समाजातही हुंड्याचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होतात. फरक इतकाच की ते अधिक सुसंस्कृत भाषेत आणि प्रतिष्ठेच्या आवरणाखाली केले जातात.आज ' हुंडा ' हा शब्द कमी वापरला जातो; त्याऐवजी ' भेट ' ' मुलीच्या भवितव्यासाठी ' , 'लग्नातील सहकार्य ', गिफ्ट ', फर्निचर ', 'वाहन ', फ्लॅट ' किंवा 'लग्नाचा खर्च ' अशा नावांनी नव्या रूपातील हुंड्याचे समर्थन केले जाते. हुंड्याचे नाव बदलले, पण व्यवहार बदललेला नाही. यातील सर्वात मोठा विरोधाभास म्हणजे समाजशास्त्र, समाजकार्य, शिक्षणशास्त्र किंवा मानसशास्त्र, मराठी, इतिहास, अर्थशास्त्र, विधी यांसारख्या मानवविज्ञान यांसारख्या विषयांचे शिक्षण घेणाऱ्या किंवा तेच विषय महाविद्यालयात शिकवणाऱ्या काही व्यक्ती स्वतःच्या विवाहाच्या वेळी लाखो रुपयांचा हुंडा स्वीकारतात.

सामाजिक शास्त्रांमध्ये हुंडा विरोधी आंदोलन, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, मानवी हक्क आणि हुंडाबंदी शिकतात आणि शिकवतात. समानता यावर काथ्याकूट करतात. विविध न्यायाच्या सिद्धांतांचा अभ्यास करतात. पण स्वतःच्या आयुष्यात त्याच मूल्यांना हरताळ फासायचा. हा विरोधाभास केवळ वैयक्तिक नाही; तो शिक्षणव्यवस्थेलाच प्रश्न विचारणारा आहे. अनेकदा नोकरी, व्यवसायासाठी लागणाऱ्या पैसे प्राप्त करण्यासाठी अनेक उच्चशिक्षित लोक विवाहाच्या वेळी मुलीकडून हुंडा घेण्यासाठी सल्ला देतात. असा सल्ला देण्यात उच्चशिक्षित आणि उच्चपदस्थ महिलासुद्धा मागे नसतात. प्रत्यक्ष हुंडा घेण्याच्या आणि हुंड्या घेण्यासाठी सामाजिक मान्यता घडवणाऱ्या अशा घटना अपवादात्मक नाहीत.

अनेक ठिकाणी सरकारी अधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर, अभियंते, वकील किंवा इतर प्रतिष्ठित नोकरी करणाऱ्या युवकांचा लग्नाच्या बाजारात जणू 'भाव' ठरवला जातो. सरकारी नोकरी म्हणजे इतका हुंडा, परदेशात नोकरी म्हणजे त्याहून अधिक, असे अलिखित दर समाजात फिरताना दिसतात.

महात्मा जोतीराव फुले क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महामानवांच्या अथक संघर्षामुळे आज समाजात अनेकांना संधी प्राप्त झाली. आज असंख्य मुले सामाजिक न्यायाच्या अंतर्गत स्थापन वसतिगृहांमध्ये, शिष्यवृत्यांवर शिक्षण पूर्ण करतात. संशोधने पूर्ण करतात. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी लागणार असली किंवा लागली की प्रचंड हुंडा घेतात. ज्या सामाजिक न्यायाच्या धोरणातून त्यांना शिक्षणाची संधी मिळाली, त्याला विसरून हुंडा घेणारे असे लोक लैंगिक असमानता पाळतात. विषमतेचे मूल्य जोपासतात.

आज मुलाचे शिक्षण आणि नोकरी ही त्याची गुणवत्ता न राहता आर्थिक व्यवहाराचे साधन बनते. त्यांच्या शिक्षणासाठी झालेला खर्च आणि दिलेला वेळ व श्रम हा हुंड्याच्या माध्यमातून वसूल करण्यावर भर देण्यात येतो.

याचा सर्वाधिक फटका मुलींच्या कुटुंबाला बसतो. अनेक पालक मुलीच्या विवाहासाठी कर्ज काढतात, शेती विकतात. आयुष्यभराची बचत खर्च करतात किंवा निवृत्तीचे पैसे वापरतात. काही कुटुंबे आर्थिक संकटात सापडतात.

विवाहानंतरही मागण्या थांबत नाहीत. मानसिक छळ, शारीरिक अत्याचार, आत्महत्या किंवा संशयास्पद मृत्यूच्या घटना आजही घडतात. त्यामुळे हुंडा हा केवळ विवाहाचा विषय नाही; तो महिलांच्या मानवी हक्कांचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.

समाजशास्त्रात 'ज्ञान आणि आचरणातील सुसंगती' हे महत्त्वाचे मूल्य मानले जाते. शिक्षक, प्राध्यापक आणि समाजपरिवर्तनाची भाषा बोलणाऱ्या व्यक्तींकडून समाजाला अधिक अपेक्षा असतात. म्हणूनच जेव्हा अनेकजण मानव विज्ञान आणि विविध विद्याशाखेतील विषय जसे समाजशास्त्र, समाजकार्य, मराठी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, विधी यांसारखे विषयांचे शिक्षण घेतात किंवा ते शिकवतात. त्यांमध्ये संशोधन करतात, त्या आधारे खाजगी आणि शासकीय नोकऱ्या प्राप्त करतात, व्यवसाय करतात. तेव्हा त्यांमध्ये काही मानवी मूल्ये रुजली की नाही असा प्रश्न पडतो. विज्ञान – तंत्रज्ञान यांसारख्या विषयांचे शिक्षण घेतलेले अनेक उच्चशिक्षित सुद्धा आपल्या जीवनात वैज्ञानिक दृष्टीकोन न स्वीकारता हुंड्यासारख्या अमानुष परंपरेचे स्वतःच्या स्वार्थासाठी पालन करतात. रूढीवादाचे समर्थन करतात.

उच्चशिक्षित व्यक्ती जी कोणत्याही विषयात शिक्षण घेतलेली असो ती व्यवहारात हुंडा घेण्याची कृती करीत असेल तर ती निश्चितच आदरास पात्र होऊ शकत नाही. कारण अशी व्यक्ती सामाजिक शास्त्र आणि विज्ञानाचे कितीही ज्ञान प्राप्त केलेली असो तिचा व्यवहार हा विषमतेचा असेल तर ती उपेक्षेस पात्र आहे.

आज हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आहे. परंतु कायद्याची भीती पुरेशी नाही. समाजातील नैतिकता, वैचारिक प्रामाणिकता आणि वैयक्तिक आचरण बदलल्याशिवाय ही प्रथा पूर्णपणे नष्ट होणार नाही. या लेखाचा उद्देश कोणत्याही व्यवसायाची किंवा संपूर्ण उच्चशिक्षित वर्गाची बदनामी करणे नाही. आजही हुंडामुक्त विवाह करून आदर्श निर्माण करत आहेत. त्यांचा सन्मानच झाला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी विचार आणि कृती यांच्यात विसंगती आहे, त्या विसंगतीकडे लक्ष वेधणे ही सामाजिक जबाबदारी आहे.

आज गरज आहे ती हुंडाबंदीवर भाषणे देणाऱ्यांची नव्हे, तर स्वतःच्या कृतीतून हुंडामुक्त समाज घडवणाऱ्या व्यक्तींची.

यामध्ये सर्वात प्रथम उच्चशिक्षित तरुणांनी स्वतःच्या आयुष्यात त्या मूल्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. कारण विचारांना कृतीची जोड मिळाली तरच समाज बदलतो; अन्यथा विचार हे केवळ व्याख्यानांमध्ये, परिषदांमध्ये, संशोधनात आणि पुस्तकांमध्येच अडकून राहतात. हुंड्याचे समाजशास्त्र आपल्याला एकच धडा शिकवतेङ्कसमाज बदलायचा असेल, तर सुरुवात स्वतःपासून करावी लागते.



**प्रफुल्ल मंदा श्रीधर**
सामाजिक कार्यकर्ता/जिल्हा कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती.
मो.९६६५१८५४२८

# निसर्गाचा रक्षक अन जनसेवेचा व्रतस्थ: उल्हासनगरचा सर्पमित्र आशिष वाघमारे!

रिक्षाचे स्टेअरिंग अन हातामध्ये सर्पदंड... जीवाची पर्वा न करता अहोरात्र धावून जाणारा एक निस्वार्थ योद्धा! रात्रीचे दोन वाजलेले असोत, मुसळधार पाऊस पडत असो किंवा कडक उन्हाचा तडाखा असो... फोनची घंटी वाजली आणि पलीकडून 'दादा, घरात साप निघालाय, पटकन या!' असा घाबरलेला आवाज आला, की एक तरुण क्षणाचाही विलंब न करता आपल्या रिक्षाची चावी हातात घेतो आणि घटनास्थळाकडे निघतो. तो तरुण म्हणजे उल्हासनगरचा निष्ठावंत सर्पमित्र आशिष वाघमारे!




आजच्या स्वार्थी जगात जिथे प्रत्येक जण स्वतःच्या फायद्याचा विचार करतो, तिथे आशिष वाघमारे हा एक असा तरुण आहे, जो स्वतःच्या जीवाशी खेळून लोकांचे आणि मुक्या प्राण्यांचे प्राण वाचवतो.

रिक्षा चालवून उदरनिर्वाह, पण ध्यास मात्र समाजसेवेचा आशिषची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तो रोज ऑटो रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा गाडा हाकतो, गरिबीशी दोन हात करत तो आपला संसार चालवत आहे. रोज रिक्षा चालवून चार पैसे कमावले तरच त्याच्या घरात चुली पेटते.

परंतु, जेव्हा एखाद्याच्या घरात किंवा परिसरात साप निघतो, तेव्हा आशिष आपलं भाडं, आपला व्यवसाय आणि स्वतःचं उत्पन्न बाजूला ठेवून धावून जातो.

कोणताही साप असो, कौशल्याने अनब शिताफीने सुटका! आशिष हा एक अत्यंत हुशार आणि अनुभवी सर्पमित्र आहे. मग तो विषारी नाग असो, मन्यार असो, घोणस असो वा भयंकर अजगर... कितीही धोकादायक परिस्थिती असली, तरी अत्यंत शिताफीने आणि शांतपणे सापाला कोणतीही इजा न पोहोचवता पकडण्यात आशिषचा हातखंडा आहे.

साप पकडणे हा काही खेळ नाही, हा थेट मृत्येशी मारलेला पैज आहे! क्षणाची चूकही जीवावर बेतू शकते. तरीही आशिषने आजवर अनेक विषारी सापांना सुरक्षितपणे पकडून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात (जंगलात) मुक्त केले आहे.

घरातील चिंता अनब समाजाची अनास्था: विचार करायला लावणारी वस्तुस्थिती! जेव्हा जेव्हा आशिषला रात्री–अपरात्री साप निघाल्याचा फोन येतो, तेव्हा त्याच्या घरातील माणसांच्या काळजाचा ठोका चुकतो. पावसापाण्यात, अंधारात, जीवाची पर्वा न करता जेव्हा तो घराबाहेर पडतो, तेव्हा त्याची पत्नी आणि कुटुंबीय तो सुखरूप परत येईपर्यंत चिंतेच्या सावटाखाली असतात.

पण सर्वात मोठा प्रश्न हा आहे की या निष्ठावंत कामाचा बदला म्हणून आशिषला काय मिळते? उत्तर आहे: काहीही नाही! आशिष हे काम कोणत्याही पगारासाठी किंवा मानधनासाठी करत नाही. परंतु, लोक मात्र त्याला गृहीत धरतात.

नागरिकांना आणि समाजाला नम्र आवाहन: 'त्याच्या'ही कुटुंबाचा विचार करा!

ज्या लोकांच्या घरात साप निघतो, ते भयाने व्याकुळ झालेले असतात. आशिष तिथे पोहोचतो, स्वतःचा जीव धोक्यात घालून साप–ाला पकडतो आणि लोकांना सुरक्षित करतो. पण साप पकडल्यानंतर त्याला साधं पेट्रोलचं किंवा चहा–पाण्याचं विचारण्याची तसदीही बरेच लोक घेत नाहीत!

तो स्वतःचे चालू भाडे सोडून तुमच्या मदतीला आलेला असतो. स्वतःच्या रिक्षाचे पेट्रोल जाळून तो तुमच्या घरापर्यंत पोहोचतो. उद्या देव न करो आणि साप पकडताना त्याच्याबाबत काही अनुचित प्रकार घडला, तर त्याच्या या गरीब कुटुंबाकडे आणि पत्नीकडे पाहायला कोणीही पुढे येणार नाही!

म्हणूनच, उल्हासनगरमधील सर्व नागरिकांना आणि प्रशासनाला हे नम्र आवाहन आहे की: आदर अन सहकार्य करा: जेव्हा एखादा सर्पमित्र सर्व कामे सोडून तुमच्या सुरक्षेसाठी धावून येतो, तेव्हा त्याला किमान त्याच्या येण्या–जाण्याचा खर्च (पेट्रोल–पाणी) आणि योग्य सन्मान देणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे.

प्रशासकीय मदतीची गरज: अशा प्रामाणिक आणि कुशल सर्पमित्राला स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींनी योग्य ते मानधन, विमा संरक्षण आणि साहित्याची मदत पुरवली पाहिजे.

आशिष वाघमारे – एक खरा हिरो! आपला व्यवसाय सांभाळून, कोणतीही अपेक्षा न ठेवता, अहोरात्र निसर्ग आणि मानवाची सेवा करणाऱ्या या 'उल्हासनगरच्या वाघाला' म्हणजेच सर्पमित्र आशिष वाघमारे याला मानाचा मुजरा! त्याच्या या निष्काम सेवेला आणि कौशल्याला समाजाने योग्य ती पोचपावती आणि आदर दिलाच पाहिजे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत निर्णय घेण्याचा अधिकार निबंधकांना नाही : उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निवाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत निर्णय घेण्याचा अधिकार निबंधकांना (रजिस्ट्रार) नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अंतर्गत निबंधकांना असलेले अधिकार हे केवळ 'पर्यवेक्षकीय' स्वरूपाचे आहेत. या अधिकारांचा वापर मालकी हक्काचे वाद सोडवण्यासाठी केला जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सायली आचार्य यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. दादरमधील वीर सावरकर मार्ग येथील एका गृहनिर्माण संस्थेतील फ्लॅटच्या मालकी हक्कावरून दोन पक्षांमध्ये वाद सुरू होता. या वादात उपनिबंधकांनी कलम ७९(२) अंतर्गत आदेश जारी करून संस्थेला याचिकाकर्त्याचे सदस्यत्व आणि शेअर प्रमाणपत्र रद्द करण्याचे तसेच पार्किंगची जागा दुसऱ्या पक्षाला परत देण्याचे निर्देश दिले होते.

श्री यशवंत बाबा विद्यालयात 'श्री यशवंत बाबा दत्तक पालक योजना' अंतर्गत

# विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य, बॅग व टिफिन वाटप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शिक्षणाबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपणारा प्रेरणादायी उपक्रम श्री यशवंत बाबा विद्यालयात पार पडला. 'श्री यशवंत बाबा दत्तक पालक योजना' अंतर्गत शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य, स्कूल बॅग आणि टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले.

वरुड येथील व्यावसायिक देवेंद्र विधळे यांनी त्यांच्या आई स्व.रेखा विधळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले तसेच उद्योजक नंदन भागवत यांनी विद्यार्थ्यांना टिफिन बॅग भेट देऊन उपक्रमात मोलाचे योगदान दिले. विद्यालयात सन २०१५ पासून सुरू असलेल्या 'श्री यशवंत बाबा दत्तक पालक योजने' अंतर्गत सुरुवातीला २२ विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात येत होते. समाजातील दानशूर व्यक्तींच्या वाढत्या सहभागामुळे सद्य: ही योजना १०० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली असून हा उपक्रम सामाजिक एकात्मतेचा आदर्श ठरत आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी.डी. कन्या शाळेचे माजी मुख्याध्यापक देविदास कोहळे तर प्रमुख अतिथी म्हणुन वरुडचे ठाणेदार अशोक जाधव उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना 'ऑपरेशन कवच' उपक्रमाविषयी मार्गदर्शन करून सुरक्षितता, कायद्याचे पालन आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व पटवून दिले.
यावेळी श्री यशवंतबाबा शिक्षण संस्थेचे सदस्य प्रा.निलेश ठाकरे, नगरसेवक प्रविण सावरकर, सरपंच कल्पना खंडार, माजी पोलीस पाटील विद्या राऊत, डॉ.यादव राऊत, श्रीधर राऊत, प्रदीप खेरडे, राहुल चौधरी, देविदास ढोक, गजानन शेळके, मोतीराम जवादे, गजानन राऊत, जानराव लायबरे, आबासाहेब राऊत, मोकळकर मामा तसेच गणवेश दाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक उमेश निस्ताने संचालन अतूल कराळे यांनी मानले. उपस्थित सर्व दात्यांचा आणि 'श्री यशवंत बाबा दत्तक पालक योजने' मध्ये सहभागी असलेल्या सर्व समाजबांधवांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच समाजातील दानशूर व्यक्ती आणि शाळा यांच्यातील सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणारा ठरला.

# विजय देशमुख यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – येथील विजय गुलाबराव देशमुख याचे वयाच्या ५५ वर्षी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने अचानक निधन झाले.

त्यांचे जीवन म्हणजे सेवाभाव, आपुलकी आणि माणुसकीचा आदर्श होते.गावातील कोणत्याही सामाजिक उपक्रमात ते नेहमी आघाडीवर असायचे. गावाच्या विकासासाठी ते नेहमी पुढाकार घ्यायचे, परमहंस श्री. यशवंतबाबा यांच्या जन्मोत्सव आणि पुण्यतिथी सोहळ्यात ते आवर्जून उपस्थित राहून सर्व कामांमध्ये मदतनीस म्हणुन उभे राहायचे तसेच योगीराज महाराज, हनुमानपेठ येथील धार्मिक कार्यक्रम आणि वाठोडा येथील विठ्ठल मंदिर देवस्थानच्या भागवत सप्ताहात त्यांचा सक्रिय सहभाग घेत.राजकीय क्षेत्रातही त्यांची चांगली ओळख होती. गावाच्या प्रश्नांसाठी ते नेहमी बोलायचे



गावात कोणाचेही निधन झाले, तरी 'विजुकाका' अंत्यविधीच्या कामासाठी सगळ्यात सर्वात आधी हजर असायचे. दुःखात सगळ्यांना धीर देणारे ते व्यक्तिमत्व होते. गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाशी ते आपुलकीने बोलायचे. म्हणुनच गाव त्यांना आदराने काका किंवा बावाजी या नावाने हाक मारायचे. सर्वांना सोबत घेऊन काम करणे हाच त्यांचा स्वभाव होता.

अशा हसमुख, मदतनीस आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्वाच्या जाण्याने वाठोडा गावावर मोठा आघात झाला आहे. त्यांची पोकळी कधीच भरुन निघणारी नाही.

त्यांचा अंत्यविधीचा वाठोडा-चांदस येथील स्मशानभूमी येथे आप्तेष्ट, स्वकीय, नातेवाईक आणि गावकरी यांचे उपस्थितीत पार पडला. त्यांच्या मागे पत्नी, मुलगी, मुलगा, भाऊ, वहिनी, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

# कोणत्याही आंदोलनात हिंसा अयोग्य : दिविजा फडणवीस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – 'कोणाच्याही चिथावणीला बळी न पडता सोशल मीडियावरील ट्रेंडचे आंधळेपणाने समर्थन करू नका.

आंदोलनात हिंसा होणे पूर्णपणे अयोग्य आहे', असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कन्या दिविजा फडणवीस यांनी केले आहे. 'नीट' परीक्षेतील गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर देशभरात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडिया पोस्टद्वारे प्रतिक्रिया देताना त्यांनी तरुणांना राजकीय पक्षांच्या जाळ्यात न अडकता सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे.

लोकशाहीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक हक्क आहे. मात्र, आंदोलकांनी पोलिसांवर किंवा पोलिसांनी आंदोलकांवर कोणत्याही स्वरूपाची हिंसा करणे चुकीचे असून त्याला अजिबात थारा मिळता कामा नये. शैक्षणिक सुधारणांसाठी किंवा विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी सुरू असलेल्या या चळवळीला पाठिंबा देण्यास हरकत नाही; परंतु या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या विशिष्ट राजकीय पक्षांना अथवा त्यांच्या विचारधारेला आंधळेपणाने पाठिंबा देऊ नका. अशा पक्षांचे खरे हेतू ओळखून सतर्क राहणे गरजेचे आहे, असे दिविजा फडणवीस यांनी म्हटले आहे. लोकशाहीत विरोधी पक्षाच्या भूमिकेवर मत व्यक्त करताना त्या म्हणाल्या की, विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांचे शत्रू बनून त्यांची बदनामी करण्यावर भर देण्याऐवजी देशहित लक्षात घेऊन विकासात्मक निर्णयांना सहकार्य केले पाहिजे.

## राणीबागेतील बंगला उपमहापौरांना नाहीच : जल विभागाच्या अखत्यारीतील बंगल्याची आता चाचपणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईतील वाढती वाहतूककोंडी, उपनगरातून दक्षिण मुंबईत येण्यासाठी लागणारा वेळ या पार्श्वभूमीवर उपमहापौर संजय घाडी यांनी राणीबागेतील अतिरिक्त आयुक्तांचा बंगला मिळावा, यासाठी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना पत्र लिहिले होते.

मात्र राणीबागेतील बंगला अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांना मंजूर केल्याने आता संजय घाडी यांनी जलविभागाच्या अखत्यारितील बंगला मिळतो का, याची चाचपणी सुरू केली आहे.

उपमहापौर म्हणून दररोज महापालिका मुख्यालयातील बैठका, सभागृहाचे कामकाज, नागरिकांच्या भेटी, विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय तसेच प्रशासकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणे आवश्यक असते. मात्र दहिसरहून मुंबई महापालिका मुख्यालयापर्यंत ये-जा करताना वाहतूक कोंडीमुळे तासनतास वेळ खर्ची पडत असून अनेकदा नियोजित वेळेत पोहोचणेही कठीण होत असल्याचे पत्र घाडी यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

## तुम्हीच आपल्या देशातील तरुणांच्या भविष्याशी सर्वाधिक खेळलाय, धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा घ्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### विद्यार्थ्यांची माफी मागा राहुल गांधींचा मोदींवर कडाडून हल्लाबोल




**मुंबई** – देशातील विविध परीक्षांच्या पेपर लीक प्रकरणांवरून, दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांसह पोरीबाळींवर केलेल्या अमानुष अत्याचारानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विटच्या माध्यमातून मौन सोडत प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान मोदी यांनी पेपर लीक प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी 'फास्ट ट्रॅक कोर्ट' स्थापन करण्याची घोषणा केली आहे. मात्र, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदींच्या या दाव्याचा तीव्र शब्दांत समाचार घेतला आहे. 'तुम्हीच आपल्या देशातील तरुणांच्या भविष्याचे सर्वाधिक नुकसान केले आहे,' असा रोखठोक आरोप करत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर जोरदार निशाणा साधला.'शिक्षण व्यवस्थेच्या नासाडीला तुम्हीच जबाबदार' राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर (ट्विटर) पोस्ट करत थेट पंतप्रधानांना घेरले. राहुल गांधी म्हणाले, 'तुम्ही केवळ आपल्या शिक्षण व्यवस्थेवर पूर्ण कब्जा होऊ दिला नाही आणि ती उद्ध्वस्त होऊ दिली नाही, तर त्याला खतपाणीही घातले. तसेच यासाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण दिले.' देशातील विद्यार्थी सध्या मोठ्या संकटातून जात असून त्यांच्या रास्त मागण्यांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# डोंबिवली येथील डॉक्टरांवरील हिंसक हल्लयाच्या निषेध

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### तहसिलदारांना निवेदन देवुन 'निमा' ने घेतला पुढाकार



**वरुड** – डोंबिवली येथील शास्त्रीनगर मधील महापालिकेच्या रुग्णालयातील डॉक्टरांवर हिंसक झालेल्या हल्लयाच्या निषेधार्थ निमा संघटना वरुड तर्फे तहसिलदारांना निवेदत देत निषेध व्यक्त करण्यात आला.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, डोंबिवली येथील शास्त्रीनगर मधील महापालिकेच्या रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यावर झालेल्या अमानुष, हिंसक हल्लयामुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. आपले संपुर्ण लक्ष रुग्णसेवेत ठेवून सेवा बजावत असतांना आरोग्य कर्मचाऱ्यावर होणारी अशी हिंसा ही केवळ व्यक्तीवर नसून संपूर्ण आरोग्य व्यवस्थेवरील हल्ला आहे. या गंभीर घटनेचा वरुड निमा संघटना निषेध व्यक्त करत आहे.

यानंतर अशा घटना होणार नाही, याची काळजी प्रशासनाने घ्यावी आणि आरोपीला कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सदर निवेदन देते वेळी निमा वरुड, निमा आयुर्वेद फोरम, निमा वुमन्स फोरमचे पदाधिकारी, सदस्य व डॉक्टर मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.

अलिफ फाऊंडेशनतर्फे जि.प.पूर्व माध्यमिक उर्दू शाळा येथे

# स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – अलिफ फाऊंडेशन तर्फे जि.प.पूर्व माध्यमिक उर्दू शाळा शहापूर येथे विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पुस्तके, पेन व इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी शरद कुकडे उपस्थित होते. अलिफ फाऊंडेशन वरुडचे मोहसिन मिर्झा व फाऊंडेशनचे सर्व सदस्य कार्यक्रमात सहभागी झाले.






यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा निलोफर परवीन अ. खालिक, माजी सरपंच शारदा पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्या दुर्गा भटकर, आशा अ.चहांदे, मुख्याध्यापक अ.रज्जाक दिलदार शाह, समीना नाहिद, अतिया अंजुम आणि किशोर भडांगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान मुख्याध्यापक, शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांनी अलिफ फाऊंडेशनच्या समाजहिताच्या कार्याचे मनापासुन कौतुक केले. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम अत्यंत प्रेरणादायी असुन भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांची अपेक्षा व्यक्त करत संस्थेचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देणे, त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे आणि शिक्षणाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण करणे, हा अलिफ फाऊंडेशन वरुडचा सातत्यपूर्ण प्रयत्न असून भविष्यातही असे सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# शबरी महामंडळाच्या महाव्यवस्थापकांची आमझरी, खटकालीला भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिकतर्फे राज्यातील २५ गावांमध्ये आदि ग्राम पर्यटन योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील आमझरी आणि खटकाली (ता. चिखलदरा) दोन गावाची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही गावांना शबरी महामंडळ महाव्यवस्थापक जयरेखा निकुंभ यांनी भेट दिली.

या भेटीदरम्यान होमस्टे लाभार्थ्यांशी संवाद साधून योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. तसेच मध्यप्रदेशातील अभ्यास दौऱ्यास भेट दिलेल्या लाभार्थ्यांकडून त्यांच्या अनुभवाची माहिती जाणून घेण्यात आली. त्यानुसार स्थानिक पर्यटन विकास, पर्यटकाभिमुख सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच होमस्टेच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक उपाययोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



शबरी आदि पर्यटन योजनेंतर्गत होमस्टेसाठी निवड करण्यात आलेल्या जागांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक पायाभूत सुविधा, पर्यटनक्षम वातावरण यावर आढावा घेण्यात आला. तसेच प्रकाश होमस्टे येथे भेट देऊन कॉफी प्लॉटची पाहणी करण्यात आली. परिसरातील नैसर्गिक पर्यटन क्षमता, उपलब्ध सुविधा व पर्यटन विकासाच्या दृष्टीने चर्चा करण्यात आले.

लाभार्थ्यांना शबरी आदि पर्यटन योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मंजूर कॉर्पस निधीचा उद्देशपूर्ण आणि नियमानुसार वापर करण्याबाबत लाभार्थ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. होमस्टे विकास, परिसर स्वच्छता, पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणे, स्थानिक संस्कृतीचे जतन व रोजगारनिर्मिती या बाबींवर विशेष भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी प्रकल्प व्यवस्थापक राजेश पवार, प्रादेशिक व्यवस्थापक सागर सोनवणे, शाखा व्यवस्थापक गणेश साखरे, सल्लागार उपजीविका मनोहर मोहिते, प्रकल्प समन्वयक सचिन देशमुख, सुनील जांबेकर, ग्राम समन्वयक वासुदेव हेकडे आदी उपस्थित होते.

# ‘ड्रग्ज प्रकरणात अडकवून आयुष्य उद्ध्वस्त करेन’

## आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना पोलिसाची धमकी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – नीट पेपरफुटीप्रकरणी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनादरम्यान ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्यांना ‘पुन्हा आंदोलनात सहभागी झालात तर खोट्या ड्रग्ज प्रकरणात अडकवू,‘ अशी धमकी एका मुंबई पोलिस अधिकाऱ्याने दिल्याचा दावा करणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमुळे मोठा वाद निर्माण झाला असून, मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, काँग्रेस आणि महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या प्रकरणावरून पोलिसांवर टीका केली आहे.



व्हायरल व्हिडिओमध्ये काय दिसते? व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये एक पोलीस अधिकारी ताब्यात घेतलेल्या काही विद्यार्थ्यांशी बोलताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये संबंधित अधिकारी, ‘पुन्हा आंदोलनात दिसलात तर तुमच्या खिशात ५० ग्रॅम पावडर (ड्रग्ज) टाकून आयुष्यभरासाठी जेलमध्ये टाकू. जामीनही मिळणार नाही,‘ अशी धमकी देताना ऐकू येत आहे. तसेच, ‘माझ्यासारखा वाईट माणूस दुसरा नाही. तुम्ही आमच्यासाठी त्रास निर्माण करत आहात,‘ असेही तो म्हणताना ऐकू येत आहे.

काँग्रेसने व्हिडिओ शेअर करत केला निषेध हा व्हिडिओ मुंबई काँग्रेसने सोशल मीडियावर शेअर करत तीव्र निषेध नोंदवला आहे. पक्षाने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ‘जर हा व्हिडिओ खरा असेल, तर हा केवळ विद्यार्थ्यांना घाबरवण्याचा प्रयत्न नसून लोकशाही अधिकारांवर थेट हल्ला आहे. स्वतःचा आवाज उठवणे हा गुन्हा नाही. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना धमक्यांनी नव्हे, तर उत्तरदायित्वाने उत्तर दिले पाहिजे.‘ हर्षवर्धन सपकाळ यांचीही टीका महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या व्हिडिओवर प्रतिक्रिया दिली आहे. आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना खोट्या ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करत, विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्यासाठी अशा प्रकारची दडपशाही लोकशाहीला काळिमा फासणारी असल्याची टीका त्यांनी केली.

# निवृत्तीवेतनधारकांसाठी ‘महा-उपलब्धी’ ॲप सुविधांचे माहेरघर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – राज्य शासनाच्या सेवेतील सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी असलेले महा-उपलब्धी हे ॲप माहिती आणि सुविधांचे माहेरघर सिद्ध होत आहे. या मोबाईल ॲपची माहिती, तसेच पेंशनधारकांच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात पेन्शन अदालत पार पडली.

यावेळी सहाय्यक संचालक दीपक भिलपवार, सहाय्यक संचालक प्रल्हाद तुमने, अप्पर कोषागार अधिकारी जयश्री उताणे, वीरेंद्र दीक्षित प्रमुख उपस्थित होते.

निवृत्तीवेतन कोषागार अधिकारी अमोल इखे यांनी, ‘महा-उपलब्धी’ ॲपमुळे निवृत्तीवेतनधारकांना दरमहाची पेमेंट हिस्ट्री, इन्कम सर्टिफिकेट, फॉर्म-१६, ई-पीपीओ लायब्ररी, ह्यातीचा दाखला आणि निवृत्तीवेतनविषयक शासन निर्णय आदी सुविधा उपलब्ध होत आहे. वरिष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांनी जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या मोबाईल ॲपचा उपयोग करण्याचे आवाहन केले.

कनिष्ठ लेखापाल लुकेश मोहोरे व आदित्य सुरजुसे यांनी लाइव्ह प्रोजेक्टरद्वारे ‘महा-उपलब्धी’ ॲपमधील डिजिटल सेवांचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच लेखालिपिक कोमल गोसावी यांनी निवृत्तीवेतनधारकांचे मोबाईल क्रमांक निवृत्तीवेतन वाहिनीवर अद्यावत करण्यासाठी ‘महाकोष’ पोर्टलवर स्वतःचे लॉगिन करून मोबाईल क्रमांक अपडेट करण्याविषयी माहिती देणारा व्हिडिओ सादर केला.



पेंशन अदालतीमध्ये उपस्थित निवृत्तीवेतनधारकांच्या समस्या व तक्रारींचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निरसन केले. अनेक क्लिष्ट प्रकरणांवर जागेवरच सकारात्मक निर्णय घेऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा देण्यात आला.

कनिष्ठ लेखापाल नयना सोलव यांनी प्रास्ताविकातून निवृत्तीवेतनाबाबत शासन निर्णय आणि इतर सुविधांबाबत कोषागार कार्यालयाची भूमिका विषद केली. कनिष्ठ लेखापाल श्रुतिका तडस यांनी सूत्रसंचालन केले. कनिष्ठ लेखापाल साजिया मोहम्मद यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी वरिष्ठ लेखापाल राम जाधव, यामिनी खरड, कनिष्ठ लेखापाल चंदन गजभिये, लेखालिपिक मनीषा भालचक्रे, वर्षा नावाडे यांनी पुढाकार घेतला.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीअंतर्गत

**बाल रुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच आर्थिक सहाय्य**

**त्रिपक्षीय करारातून राज्यातील २०० बालरुग्णांना मिळणार लाभ**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

महागड्या निदान चाचण्यांमुळे उपचार प्रक्रियेत होणारा विलंब टाळून कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. या विशेष उपक्रमांतर्गत राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांना निदानासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या लाभाअंतर्गत ० ते १८ वयोगटातील पात्र बालरुग्णांना कर्करोगाचे निदान निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक तसेच पुढील खर्चिक वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या सहाय्यामुळे आर्थिक अडचणींमुळे निदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळून वेळेत निदान आणि उपचाराचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे.

पहिल्या दोन महिन्यांतच ५९ बालरुग्णांना ५० लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. या सर्व बालरुग्णांचे कर्करोग निदान टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले.

बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच सुरू करण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. वेळेत निदान झाल्यामुळे उपचाराला होणारा विलंब कमी होऊन बालरुग्णांना योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभ राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या २०० लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ५९ बालरुग्णांना निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

# मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी विशेष मोहीम : गणनापत्रक भरून देण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – भारत निवडणूक आयोगामार्फत मतदारयादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पूर्णपणे नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे. मतदारयादीत नाव कायम ठेवण्यासाठी दि. २४ ते २६ जुलैदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी मतदानकेंद्रावर जाऊन गणनापत्रक भरून द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

मतदारांनी गणनापत्रक भरून दिले नसल्यास त्यांची नावे आगामी प्रारूप मतदारयादीमधून वगळल्या जातील. उर्वरित मतदारांचे नाव मतदारयादीत यावे, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष मोहीम राबवली जात आहे. शुक्रवार, दि. २४ जुलै ते रविवार, दि. २६ जुलै दरम्यान दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्व संबंधित विधानसभा मतदान केंद्रे ही विशेष मोहिम राबविली जाणार आहे. त्यामुळे मतदारांनी गेल्या २०२४ मधील विधानसभा निवडणुकीत ज्या केंद्रावर मतदान केले आहे, त्याच ठिकाणी उपस्थित राहावे लागणार आहे. उपस्थित बीएलओकडून गणनापत्रक प्राप्त करून घ्यावे, तसेच सदर अर्ज पूर्ण भरून बीएलओकडे त्वरित जमा करावे. यामुळे मतदार यादीत मतदारांचे नाव समाविष्ट होण्यापासून कोणीही वंचित राहणार नाही.

# जिल्हाधिकारी कार्यालयात अजित पवार यांना अभिवादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून आदरांजली वाहिली.



# विभागीय आयुक्तालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी उपायुक्त संतोष कवडे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते.



# अस्वच्छता, एक्सपायर झालेले अन्नपदार्थ अनब नियमांचं उल्लंघन : पुण्यातील १२ हॉटेल्स, रेस्टॉरंट्सला एफडीएचा दणका, या बड्या ठिकाणांचे परवाने केले रद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – अन्नसुरक्षा व स्वच्छतेचे नियम पायदळी तुडविणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट आणि बेकरी व्यावसायिकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई केली आहे.



मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता, मुदतबाह्य अन्नपदार्थांची साठवणूक तसेच अन्नसुरक्षा कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन आढळून आल्याने पुणे विभागातील १२ आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत. यात पुणे जिल्ह्यातील १० व सातारा जिल्ह्यातील २ आस्थापनांचा समावेश आहे. याशिवाय प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

एफडीएच्या मोहिमेअंतर्गत १८ आणि २१ जुलै रोजी पुणे विभागात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी अस्वच्छ परिसर, मुदतबाह्य अन्नपदार्थांचा साठा, अन्न हाताळणीतील निष्काळजीपणा तसेच स्वच्छतेच्या निकषांचे उल्लंघन निदर्शनास आले. कारवाईत पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, मावळ, जुन्नर, खेड तसेच सातारा जिल्ह्यातील वडूज येथील आस्थापनांचा समावेश आहे.

पुणे जिल्ह्यात जोकर हॉस्पिटॅलिटी (वालेवाडी, पुणे), रेड ॲण्ड ह्युज (कल्याणीनगर, पुणे), टोणी दा ढाबा (नायगाव कामशेत, ता. मावळ), हॉटेल लोकप्रिय (मार्केट यार्ड, पुणे), फाऊंटन प्युअर व्हेज (आळेफाटा, ता. जुन्नर), के. एम. फुड्स (भांबुरवाडी, ता. खेड), अक्सा बेकरी (आदर्श नगर, पीसीएमसी), जय सद्गुरू इराणी चहा अँड स्नॅक्स सेंटर (मार्केट यार्ड, पुणे), फोक्लो टेक्नॉलॉजी प्रा. लि., स्वींस्टा एन्ट प्रा. लि. (बावधन, पुणे) या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली.

सातारा जिल्ह्यातील कारवाईत शालीमार उडपी व्हेज रेस्टॉरंट (वडूज, ता.खटाव) आणि सुरभी हॉटेल अँड बार (वडूज, ता.खटाव) या १२ आस्थापनांचा समावेश आहे ३ लाख ४८ हजारांचा अन्नसाठा जप्त; पुणे विभागातील चिंचवडमध्ये कारवाई याशिवाय १६ ते २१ जुलैदरम्यान पुणे विभागातील चिंचवड, पंढरपूर आणि सातारा जिल्ह्यातील वडूज येथे तीन आस्थापनांवर स्वतंत्र कारवाई करण्यात आली. या ठिकाणी ३ लाख ४८ हजार ७८ रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

३ लाख ४८ हजारांचा अन्नसाठा जप्त; पुणे विभागातील चिंचवडमध्ये कारवाई याशिवाय १६ ते २१ जुलैदरम्यान पुणे विभागातील चिंचवड, पंढरपूर आणि सातारा जिल्ह्यातील वडूज येथे तीन आस्थापनांवर स्वतंत्र कारवाई करण्यात आली. या ठिकाणी ३ लाख ४८ हजार ७८ रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.







# घनकचरा व्यवस्थापनाबाबत विविध मान्यवरांच्या संमिश्र प्रतिक्रिया

## लवकरच नवीन टेंडर प्रक्रिया राबविणार : मुख्याधिकारी गजानन भोयर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – वरुड नगर परिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील कथित अनियमितता आणि निष्काळजी कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, विविध स्तरातून प्रतिक्रिया उमटत आहेत. शहरात स्वच्छतेसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असताना प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये कचरा वेळेवर उचलला जात नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, शहरात ठिकठिकाणी कचरा संकलनासाठी क्युआर कोड स्कॅनर बसविण्यात आले असले तरी त्यांचा वापर होत नसल्यामुळे कचरा संकलन करणारी वाहने प्रत्यक्ष त्या ठिकाणी येतात की नाही? याची कोणतीही खातरजमा होत नाही. त्यामुळे संपूर्ण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



अनेक भागांत कचरा ओसंडून वाहत असून दुर्गंधी, डास आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. पावसाळ्यात ही समस्या अधिकच तीव्र होत असून संसर्गजन्य आजार पसरण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही अपेक्षित सुधारणा होत नसल्याचा आरोप केला आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेली यंत्रणा, वाहने आणि मनुष्यबळ यांचा प्रभावी वापर होत आहे का तसेच शासनाच्या निधीचा योग्य विनियोग झाला आहे का? याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच शहरातील घनकचरा व्यवस्थापन पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. 'स्वच्छ शहराचा दावा आणि प्रत्यक्षातील अस्वच्छता यामधील दरी आता भरून काढणे गरजेचे आहे,' अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली.





"या काही अडीअडचणी येत आहेत, त्याबाबत संबंधित ठेकेदाराशी चर्चा करुन त्याला समज देण्यात येईल, यापुर्वी सुध्दा संबंधित ठेकेदाराने ज्या ज्या वेळी नियम आणि अटींची पायमल्ली केली तेव्हा तेव्हा नगरपरिषदेकडून दंड ठोठावण्यात आला आहे, अशी प्रतिक्रिया नगराध्यक्ष ईश्वर सलामे यांनी व्यक्त केली.



"जाती-धर्माचा, हिंदू-मुस्लिमाचे भय दाखवुन जर निवडणुका लढविल्या जात असतील आणि त्या जिंकल्या जात असतील तर त्यामधून अर्थाजनासाठी अशीच पिलावड निर्माण होणार आहे. संबंधित लोकांना १५ ते २० हजार रुपये महिना पगार असल्याचा सरकार सुरु आहे, नगरपरिषदेचे लचके तोडण्याचे काम सर्व विभागात सुरू आहे, याची कल्पना काही नागरिकांना आहे परंतु ते सुद्धा उघड्या डोळ्यांनी दिसत असतानांही धृतराष्ट्राची भूमिका अदी करीत आहेत. सद्य: एकच नारा सुरू आहे, 'जाऊ तिथे खाऊ' न्याय कुणाकडे मागावा? हा प्रश्न आहे तरी प्रशासनाने सर्व स्तरावर होत असलेला भ्रष्टाचार थांबवावा व स्वच्छ सुंदर पर्यावरणपूरक वरुड शहर बनवण्यासाठी योगदान द्यावे, नागरिकांनी सुद्धा बघ्याची भूमिका न घेता, मी विनंती करतो की 'उघड्या डोळ्यांनी बघा नीट' म्हणजे शहरांमध्ये काय सुरू आहे? याचा प्रत्यय येईलें अशी प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष स्वाती आंडे यांचे पती युवराज आंडे यांनी व्यक्त केली.



"ही सर्व जबाबदारी कंत्राटदाराची असून त्याने ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे गरजेचे आहे, नगरपरिषदेने सुध्दा कंत्राट देतांना तो चांगले काम करीत आहे की नाही याची चाचपणी करुन संबंधित कंत्राटदार ते काम करण्यास सक्षम आहे किंवा नाही याबाबत तपासणी करुनच त्याला तो कंत्राट दिला जावा, अशी प्रतिक्रिया भाजपा माजी नगरसेवक सुरेश दुर्गे यांनी व्यक्त केली.



"यावर्षीचे देयक पाहता असे लक्षात येते की, गावात एकाएकी घनकचऱ्याचा महापूर आलेला असेल. महिन्यातून २ वेळा नाली सफाई होत असतांना एवढा कचरा येतो कुठून? असा प्रश्न निर्माण होतो, माहीतीच्या अधिकारात माहीती घेतली असता असे दिसुन येते की, प्रशासक काळापेक्षा दुप्पट ते तिप्पट खर्च हा घनकचरा व्यवस्थापनावर झालेला आहे व होत आहे. यातून पैशाचा मोठा अपव्यय होत असल्याचे दिसून येते त्यामुळे जनतेने सुध्दा याचा जाब विचारावा, अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे धिरज खोडस्कर यांनी व्यक्त केली.



"विविध तांत्रिक अडचणी आणि आचारसंहितेमुळे घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे टेंडर लावण्यास उशिर झाला होता त्यामुळे जुन्याच कंत्राटदाराला ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती आता सर्व मार्ग मोकळे झाल्यानंतर शासनाकडून प्रशासकीय मंजुरात मिळताच टेंडर लावुन नविन कंत्राटदाराची निवड करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल, अशी प्रतिक्रिया मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी दिली.

# 'एखाद्या मंत्र्याचा राजीनामा घेतल्याने सरकारची सत्ता जाणार नाही' : अण्णा हजारेंचे पीएम मोदींना खरमरीत पत्र

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – सह देशातील विविध शहरांमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंनी (अपपर करूीश) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. 'लोकशाहीत जनतेचा आवाज दडपून नव्हे, तर संवादातून प्रश्न सोडविण्याबाबत' असा या पत्राचा विषय असून, आंदोलनादरम्यान घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अण्णा हजारेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, 'नवी दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काल घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक आहेत. लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारच्या घटना घडणे कोणाच्याही हिताचे नाही. कोणत्याही परिस्थितीत हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा अनावश्यक बळाचा वापर टाळला गेला पाहिजे, असे माझे ठाम मत आहे.'

२२ मुलांनी निराश होऊन आयुष्य संपवले 'आज देशातील लाखो तरुण पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, बेरोजगारी आणि इतर अनेक प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता, ती समाजातील वेदना आणि अपेक्षा म्हणून समजून घेणे आवश्यक आहे. यापूर्वी २०२४ मध्ये नीट च्या परीक्षेचे पेपर फुटी व गोंधळ समोर आला.

# पेपरफुटीवर अखेर पंतप्रधान मोदी बोलले!

## फास्ट ट्रॅक कोर्टाची घोषणा : आंदोलक विद्यार्थ्यांना दिलं मोठं आश्वासन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**दिल्ली** - देशभरात चर्चेत असलेल्या नीट पेपर लीक प्रकरणावर केंद्र सरकारने मोठा निर्णय जाहीर केला आहे. परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी आणि दोषींना लवकरात लवकर शिक्षा मिळावी यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर केलेल्या पोस्टमध्ये विद्यार्थ्यांच्या भवितव्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे नमूद केले. पेपर लीकच्या सर्व प्रकरणांची जलद सुनावणी व्हावी आणि दोषींना कठोर शिक्षा मिळावी यासाठी संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. अलीकडच्या काळात विविध स्पर्धा परीक्षांमधील पेपर लीकच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात काही विद्यार्थी संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी आंदोलन केले.

या घडामोडींनंतर परीक्षा व्यवस्थेवर अधिक विश्वास निर्माण करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, फास्ट ट्रॅक कोर्टामुळे पेपर लीकशी संबंधित प्रकरणांचा निकाल कमी वेळात लागण्यास मदत होईल.

# अपघातग्रस्त तरुणीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची तात्काळ मदत

**संवेदनशीलतेतून अजित दादांच्या कार्यशैलीची आठवण**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**बारामती** – राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज पहाटे बारामतीमध्ये विकासकामांच्या पाहणीसाठी जात असताना मार्गात एका तरुणीचा अपघात झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. प्रसंगाचे गांभीर्य ओळखत त्यांनी तत्काळ आपला ताफा थांबवला आणि अपघातग्रस्त तरुणीची प्रत्यक्ष जाऊन विचारपूस केली. यावेळी सुनेत्रा पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आणि सहकाऱ्यांना तातडीने आवश्यक मदत करण्याच्या सूचना देत तरुणीला त्वरित रुग्णालयात दाखल करण्याची व्यवस्था केली. तसेच, उपचारात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आपल्या स्वीय सहाय्यकांनाही रुग्णालयात सोबत पाठवून उपचारांची संपूर्ण खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. दरम्यान, सुनेत्रा पवार यांनी दाखविलेल्या या संवेदनशीलता, तत्परता आणि माणुसकीच्या भावनेमुळे उपस्थित नागरिकांना दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जनतेप्रती असलेल्या तत्पर आणि लोकाभिमुख कार्यशैलीची आठवण झाली.




